# बृहन्मुंबई महानगरपालिका

**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांवvi) या पदांसाठी कर्मचा-यांमधून उमेदवारांची निवड करण्याबाबत.**

**सुधारित परिपत्रक**

**क्रमांक- नअ/१८९०३/आसेप्र दिनांक ११.०१.२०१९**

**१.** अभियांत्रिकी विभागाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) या पदाकरिता कामगार (खाडा बदली व रोजंदारीवर काम करणारे कामगार वगळून), लिपिक किंवा अन्य तत्सम पदावर काम करणा-या महानगरपालिकेच्या सर्व खात्यांतील पात्र आणि अर्हताधारक कर्मचा-यांकडून विहित नमुन्यानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२.** परिपत्रक क्र. नअ/१५८८०/आसेप्र दि. ३०.११.२०१८ अन्वये यापूर्वीच खुल्या प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना एसईबीसी या मागास प्रवर्गातून पुन:श्च अर्ज करण्याची मुभा देण्यात येत आहे. तसेच, इतर आरक्षण जसे अजा, अज, विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड), विमाप्र, इमाव प्रवर्गातून यापूर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तथापि, ज्या उमेदवारांनी उपरोक्त परिपत्रकान्वये दिलेल्या मुदतीत अर्ज केलेला नसल्यास सर्व प्रवर्गातील उमेदवार नव्याने खालील नमूद कालावधीत अर्ज करू शकतात.

**३.** अर्जदारांनी आपले अर्ज आपापल्या वरिष्ठांमार्फत **दि. ११.०१.२०१९ पासून दि. १७.०१.२०१९ पर्यंत** (कार्यालयीन वेळेत ) नगर अभियंता यांच्या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. सदर कालावधीपूर्वी वा नंतर प्राप्त झालेले तसेच आवश्यक ती सर्व प्रमाणपत्रे/कागदपत्रे न जोडलेले अथवा अपूर्ण असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**४.** **पदांचा तपशील:**

(१) **पदाचे नांव व गट:** कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) 'ब' गट

(२) **वेतनश्रेणी:** कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत)
:रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४३००/-

(३) **रिक्त पदांची संख्या:** कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) - ७८
कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) - १२

(रिक्त पदे यांच्या संख्येत आणि अनुशेष यामध्ये बदल होऊ शकतो.)

**५.** **मागासवर्गीयांकरिता आरक्षण**: (अनुशेष असल्यास तो विचारात घेऊन)

**(।) – सामाजिक व समांतर आरक्षण**

| प्रवर्ग | सर्वसाधारण | 30% महिलांकरिता आरक्षीत पदे | 3% अपंगा-करिता आरक्षीत पदे | एकूण रिक्त पदे | सर्वसाधारण | 30% महिलांकरिता आरक्षीत पदे | 3% अपंगा-करिता आरक्षीत पदे | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदनाम | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | | | | कनिष्ठ अभियंता (यांवvi) | | | |
| अ.जा. | 7 | 3 | श्रवण शक्तीतील दोष - 2 पदे चलनवलन विषयक विकलांगता - 3 पदे | 10 | 1 | 1 | श्रवण शक्तीतील दोष - 1 पद चलनवलन विषयक विकलांगता - 1 पद | 2 |
| अज. | 7 | 3 | | 10 | 2 | 1 | | 3 |
| विजा(अ) | 2 | 1 | | 3 | 0 | 0 | | 0 |
| भज(ब) | 0 | 0 | | 0 | 1 | 0 | | 1 |
| भज(क) | 1 | 0 | | 1 | 0 | 0 | | 0 |
| भज(ड) | 1 | 1 | | 2 | 0 | 0 | | 0 |
| इमाव | 6 | 3 | | 9 | 0 | 0 | | 0 |
| विमाप्र. | 2 | 0 | | 2 | 0 | 0 | | 0 |
| सा.व शै. मागासवर्ग | 8 | 4 | | 12 | 1 | 1 | | 2 |
| खुला | 21 | 8 | | 29 | 3 | 1 | | 4 |
| **एकूण** | **55** | **23** | | **78** | **8** | **4** | | **12** |

(II) आरक्षण/ अनुशेष यांत बदल होण्याची शक्यता आहे.

(III) विजा(अ),भज(ब),भज(क) व भज(ड) या प्रवर्गातील विहित आरक्षण त्या त्या प्रवर्गातील कर्मचारी उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

(IV) विजा(अ),भज(ब), भज(क) व भज(ड), इमाव., विमाप्र. आणि सा.व शै. मागासवर्ग (एसईबीसी) या प्रवर्गातील कर्मचा-यांच्या बाबतीत सामाजिक तसेच समांतर आरक्षणाचा फायदा त्या प्रवर्गातील जे कर्मचारी प्रगत व उन्नत व्यक्ती गटात मोडत नसतील त्यांनाच अनुज्ञेय राहील. यास्तव त्यांनी त्याबाबतीत सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेली विहित नमुन्यातील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नविनतम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील स्त्री उमेदवारांनी देखील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नविनतम प्रमाणपत्र (Latest Non Creamylayer Certificate) सादर करणे आवश्यक राहील.

(V) मागासवर्गीय कर्मचा-यांनी सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेल्या जात व जात वैधता प्रमाणपत्राची तसेच साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या त्रिअक्षरी संकेतांकासह संपूर्ण क्रमांक व दिनांक जात वैधता प्रमाणपत्रावर असणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास परिपत्रक क्र.एमबीसी/7100 दि.31.01.2012 अन्वये उमेदवाराने नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(VI) सुचना परिपत्रक / जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

(VII) शासन निदेशानुसार महिला आरक्षणाची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(VIII) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

(IX) शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांकडून किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या नि:समर्थ व्यक्तिंना महानगरपालिका वैद्यकीय मंडळाकडे वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले जाईल.

(X) परिपत्रक क्र.एमबीसी/5834 दि.27.07.2013 मधील निदेशान्वये अर्ज करणाऱ्या ज्या उमेदवारांनी / कर्मचाऱ्यांनी यापूर्वी मनपा सेवेत आरक्षणाचा फायदा घेतलेला आहे वा घेणार आहे, अशा उमेदवारांनी / कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(XI) नि:समर्थ उमेदवारांनी सदर पदाची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता / पात्रता याबाबतची अपेक्षा दर्शविणा-या माहितीचा तक्ता सोबत जोडण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे.

## ६. <u>अर्हता:</u>

### १) <u>कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)</u>

१) कर्मचा-याची मुंबई महानगरपालिकेतकिमान दोन वर्षे नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे.

२) उमेदवाराने एस.एस.सी. वा समकक्ष परीक्षेनंतर 3 वर्षाची स्थापत्य वा कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजिमधील वा पब्लिक हेल्थ इंजिनिअरींग मधील पदविका संपादीत केलेली असावी किंवा महाराष्ट्र शासनाने ज्या पदविकेशी समकक्ष ठरविलेली व मुंबई महानगरपालिकेने मान्य केलेली तत्सम पदविका संपादित केलेली असावी किंवा उमेदवार महानगरपालिकेने मान्य केलेली स्थापत्य अभियांत्रिकी मधील उच्च व्यावसायिक अर्हता महापालिका सेवेत येण्यापूर्वी/ सेवेत असताना धारण करणारा असावा.

३) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४) उमेदवार ''डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.इ.सी.टी. चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्यावेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

२) **<u>कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत)</u>**

१) कर्मचा-याची मुंबई महानगरपालिकेतकिमान दोन वर्षे नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे.

२) उमेदवाराने किमान एस.एस.सी. व समकक्ष परिक्षेनंतर किमान ३ वर्षांची, यांत्रिकी विद्युत / ऑटोमोबाईल/ इलेक्ट्रॉनिक्स / प्रॉडक्शन इंजिनिअरींगमधील पदवीका किंवा डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स पॉवर सिस्टीम / डिप्लोमा इन इंडस्ट्रीअल इलेक्ट्रोनिक्स / डिप्लोमा प्रोग्रॅम इन इन्स्ट्रयुमेंटेशन / डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स ऍण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरींग संपादित केलेली असावी.

**किंवा**

इंन्स्टिटयूशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची टेक्नीशिअन इंजिनिअरींग एक्झामिनेशन उत्तीर्ण झालेला असावा.

**किंवा**

महाराष्ट्र शासनाने या पदविकेशी समकक्ष ठरविलेली व मुंबई महानगरपालिकेने मान्य केलेली तत्सम पदविका संपादित केलेली असावी.

**किंवा**

उमेदवार महानगरपालिकेने मान्य केलेली उच्च व्यावसायिक अर्हता धारण करणारा असावा.

३) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४) उमेदवार ''डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.इ.सी.टी. चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्यावेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**<u>टीप :</u>**

i) सदर पदे उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन पदविका/ पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षातील गुणांच्या टक्केवारीनुसार गुणानुक्रम ठरवून त्यानुसार निवड यादी बनवून भरण्यात येतील.

**ii)** कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांची गुणवत्ता विचारात घेऊन पदांच्या उपलब्धतेसापेक्ष पात्र उमेदवारांची नियुक्ती केली जाईल.

**iii)** अर्ज करु इच्छिणा-या कर्मचा-याचा एकाच प्रवर्गाचा अर्ज स्वीकारला जाईल.

**iv) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) / तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्था यांना संबंधित अभियांत्रिकी पदविका/पदवी अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे. अशा संस्थांमधून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचेच अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.**

**v) जे उमेदवार सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एस.ई.बी.सी.) आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छित आहेत. त्या प्रवर्गातील उमेदवारांकडे सद्य:स्थितीत जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सध्या उपलब्ध नसण्याची शक्यता विचारात घेता, त्यांना जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राशिवाय सध्या अर्ज करता येईल. तथापि, सदर उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीच्या वेळी जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.**

**vi) शासन शुध्दीपत्रक क्र. बीसीसी२०१८/प्रक्र ५८१ए/२०१८/१६ब दि. १९.१२.२०१८ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एस.ई.बी.सी.) प्रवर्गातून आरक्षणाच्या तरतूदीनुसार अर्ज करणा-या उमेदवारांच्या निवडीबाबतचा निर्णय, न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेतील अंतिम आदेशासापेक्ष राहिल.**

सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या (जसे शैक्षणिक प्रमाणपत्र, सर्व सत्रांच्या /वर्षाच्या गुणपत्रिका अनुभव, मागासवर्गीय असल्यास याबाबत दाखला जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी तसेच समांतर आरक्षणाबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रतिलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अनुसूचित जात आणि अनुसूचित जमात प्रवर्ग सोडून इतर सर्व मागास प्रवर्गामधून अर्ज करणा-या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या अनुसूचित जात आणि अनुसूचित जमात प्रवर्ग सोडून इतर सर्व उमेदवारांनी सुध्दा सदर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

संबधित खात्याने अर्ज कर्मचा-याच्या सेवा अभिलेखावरुन पडताळावा.

सही/-११.०१.२०१९

**नगर अभियंता**

| नि:समर्थ उमेदवारांच्या पदनिश्चितीचा तक्ता | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पदनाम | शारीरीक पात्रता | अपंगत्वाचा प्रकार | कामाचा प्रकार/जबाबदारी |
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | बसणे, उभे रहाणे, चालणे, वाकणे, हातांच्या बोटांची हालचाल करणे, पहाणे, वाचणे व लिहिणे, ऐकणे, संवाद साधणे | एक हात (OA), एक पाय (OL), दोन्ही पाय (BL), श्रवणशक्ती-तील दोष (HH) | स्थापत्य अभियंता, सर्वसाधारण आराखडे, संघटनात्मक कार्य आणि बांधकामावरील देखरेख, इमारतींची दुरुस्ती, रस्ते, धरणे, पूल बोगदा, कालवा, विभागातील बहुमजली इमारती, पाईप लाईन टाकणे इ. कामे वास्तूशास्त्रज्ञ किंवा अन्य स्थापत्य अभियांत्रिकीमधील तज्ञ यांच्या मदतीसह वा मदतीशिवाय करणे. संबंधित प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार वास्तुशास्त्रज्ञ यांनी बनविलेल्या योजनेचे नकाशे/ आराखडे तयार करणे, प्राथमिक सर्वेक्षण करण्याकरीता स्थळपहाणी करणे व आवश्यक असलेली मापने, जमीनीच्या मातीची स्थिती, साहित्य व कामगारांची उपलब्धता इ. बाबींची माहिती (स्थापत्य अभियांत्रिकीमधील तज्ञ, ओव्हरसिअर व अंदाजपत्रक बनविणा-यांच्या मदतीसह वा मदतीशिवाय पारत करणे) योजनेच्या कामाचे संकल्पचित्रे, विस्तृत आराखडे व किंमतीचे सविस्तर अंदाजपत्रक अनुरेखकाची मदत घेवून अथवा स्वत: तयार करणे. व संबंधित विभाग वा प्राधिकरणाकडून संमत करुन घेणे. आवश्यक सामुग्री, यंत्रे, कामगार यांची व्यवस्था करणे आणि जागेवर काम चालू करणे. कामाच्या प्रगतीतील प्रत्येक टप्प्यामधील तपशीलाप्रमाणे कामाची योग्यत-हेने अंमलबजावणी होते का याची खात्री करणे, जागेची पहाणी तसेच ओव्हरसीअरने अधिदानाकरीता बनविलेल्या देयकांची तपासणी करणे. |
| २ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | बसणे, उभे रहाणे, चालणे, वाकणे, खेचणे व ढकलणे, गुडघे टेकणे व हातपाय दुमडणे, हातांच्या बोटांची हालचाल करणे, पहाणे, वाचणे व लिहिणे, संवाद साधणे | एक पाय (OL), श्रवणशक्तीतील दोष (HH) | सर्वसाधारण आराखडे, रुपरेषा, विद्युतयंत्रे, वायरिंग, उपकरणे यांची उभारणी , प्रक्रीया उत्पादन व विद्युत उपकरणाचे परिरक्षण करण्याकरता पर्यवेक्षण करणे, विद्युत कामाची योजना मांडणी तसेच चित्रे तयार करणे, वायरींग आकृत्या तयार करणे, विद्युत कामाची सर्वकष अंदाज पत्रके तयार करणे, तपासणे, कामाची उभारणीबाबत योग्य तांत्रिक प्रत्येक पातळीवर देऊन पर्यवेक्षण करणे, झालेल्या कामाची तपासणीकरुन सर्व विद्युत यंत्रणा तांत्रिक तपशील व सुरक्षा लक्षात घेऊन योग्य रित्या कार्यरत आहेत यांची तपासणी करणे. विद्युत उपकरणे दुरुस्ती व देखभाल करण्याकरता सुचित करणे, ट्रान्सफॉर्मर, स्वीचगीअर, साधी विद्युत उपकरणे इ. तसेच विद्युत उर्जा निर्माण व वहन याबाबत विशेष सुधार करण्याबाबत रचना व आराखडे तयार करणे. कमी खर्चाच्या योजना अमलात आणून विद्युत यंत्रणेत सुधारणा करणे.<br>महापालिकेने वेळोवेळी नेमून दिलेली कामे पूर्ण करणे, कामाच्या खर्चाची अंदाजपत्रके, निविदा तयार करणे, प्रशासकीय कामे पार पाडणे. |
| ३ | कनिष्ठ अभियंता (दुरसंचार) | बसणे, उभे रहाणे, चालणे, वाकणे, हातांच्या बोटांची हालचाल करणे, पहाणे, वाचणे व लिहिणे, ऐकणे, संवाद साधणे | एक हात (OA), एक पाय(OL) | कनिष्ठ अभियंता (दुरसंचार) यांनी करावयाची सर्वसाधारण कामे रुपरेषा- दुरसंचार यंत्रणेचे आराखडे निर्मात्यांना करणे, स्थापित करणे, तारायंत्र व दुरध्वनी यंत्रणेचे प्रचालन व देखभाल दुरुस्ती करणे, रेडीओ, रडार, विशेष मायक्रोव्हेव, दुरसंचार साधने याबाबत उभारणी करण्याकरता सर्वेक्षण करुन योजना आखून योग्य तपशीलासह रेखाचित्रे तयार करणे. योग्य दुरसंचार यंत्रे जशी - टेलिप्रींटर्स, सिग्नल यंत्रणा, बिनतारी संदेश, रेडीओ रिसिव्हर यांची उभारणी करणे, ओव्हरहेड अंडरग्राऊंड केबल तारा टाकणे बाबत पर्यवेक्षण करणे, नियतकालिक यंत्रणेची देखभाल करुन तातडीच्या बिघाड दुरुस्त्या करुन टेलिफोन, फॅक्स यंत्रणा कार्यरत राखणे. विशेष उपकरणे देखभाल करणेसाठी विशेष सर्वसाधारण रचना करुन टेलिफोन, तारयंत्रे, टेलिप्रिंटर, रेडीओ यंत्रणा अद्ययावत करणे.<br>महापालिकेने इतर वेळोवेळी नेमून दिलेली कामे पूर्ण करणे, कामाच्या खर्चाची अंदाजपत्रके, निविदा तयार करणे, प्रशासकीय कामे पार पाडणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | बसणे, उभे रहाणे, चालणे, वाकणे, गुडघे टेकणे व हातपाय दुमडणे, हातांच्या बोटांची हालचाल करणे, पहाणे, वाचणे व लिहिणे, ऐकणे, संवाद साधणे | एक हात (OA), एक पाय (OL), श्रवणश-क्तीतील दोष (HH) | सर्वसाधारण आराखडे (नकाशे), रुपरेषा आणि उभारणी, प्रक्रीया, उत्पादन व यंत्र व उपकरणे यांचे परिरक्षण करण्याकरीता पर्यवेक्षण करणे. बांधकामाचे दर्शविलेले तपशीलानूसार जागेचे नकाशे रुपरेषा तयार करणे आणि प्रत्यक्ष यंत्रे / उपकरणे यांची उभारणी करणे. कार्यरत असलेल्या यंत्राच्या कार्यतत्परतेबाबत अभ्यास करणे. कार्यक्षमता वाढविण्याकरीता सुधारणा सुचविणे, उत्पादनाच्या तांत्रिक बाजूचे पर्यवेक्षण करणे, योग्य दर्जाच्या खात्रीकरीता कारखान्यातील वेगवेगळया टप्प्यावरील उत्पादनाची तपासणी करणे. गती व वेळ यांचा अभ्यास करणे व कार्यक्षमतेचा विचार करणे, उत्पादनाच्या आर्थिक बाबींचा विचार करणे. कार्यक्षम प्रक्रीयेकरीता कारखान्यातील टूल्स, उपकरणे/ विविध भाग यांची दुरुस्ती व परिरक्षण करणे. करखाना कायदे, वैधानिक तरतूदींच्या बाबत सुरक्षितता सुधारणा आणि निरीक्षणाबाबत खात्री करणे. तपशीलानूसार बाहेर दिलेल्या, आत आलेल्या वस्तू भंडाराची तपासणी करणे, मागणीपत्र तपासणे.<br>सी.सी.टिव्ही, लॅन कनेक्टिवीटी, दूरध्वनी यंत्रणा, सौरउर्जा या कामाबाबतची अंदाजपत्रके तयार करणे. विद्युत धाहिणीतील विद्युत कामे पार पाडणे तसेच पंप दुरुस्ती व देखभाल इत्यादी कामे पार पाडणे. |
| ५ | कनिष्ठ अभियंता (इलेक्ट्रॉनिक्स) | बसणे, उभे रहाणे, चालणे, वाकणे, गुडघे टेकणे व हातपाय दुमडणे, हातांच्या बोटांची हालचाल करणे, पहाणे, वाचणे व लिहिणे, ऐकणे, संवाद साधणे | एक हात (OA), एक पाय (OL), श्रवणशक्तीतील दोष(HH), दोन्ही पाय (BL) | इलेक्ट्रॉनिक्स अभियंता इलेक्ट्रॉनिक उपकरणे तपासणी किंवा चाचणी करण्यात निष्णांत / तज्ज्ञ इलेक्ट्रॉनिक्स अभियंतांना धरून संशोधन कार्य पार पाडणे, इतरत्र वर्गीकरण नसलेल्या इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी मधील समस्यांकरीता तांत्रिक सल्ला देणे. |

**सही/-**
**नगर अभियंता**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय
## अर्जदाराने भरावयाची माहिती

| | |
|---|---|
| ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नांव - | उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी. |
| १. अर्जदाराचे संपूर्ण नाव (मराठी) - श्री./श्रीम. - | |
| Applicant's Full Name (English) – Shri/Smt.- | |
| २. वडिलांचे /पतीचे संपूर्ण नाव - | |
| मोबाईल क्रमांक | |
| आधार क्र. | |
| पॅन क्र. | |

| | |
|---|---|
| ३. संपूर्ण पत्ता (कायमचा) -<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ | संपूर्ण पत्ता (पत्रव्यवहाराचा)<br>----------------------------------------------<br>----------------------------------------------<br>----------------------------------------------<br>---------------------------------------------- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. जन्मदिनांक: | | | | योग्य ठिकाणी (✔) असे चिन्ह करा | |
| ५. माध्यमिक शालांत परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण आहात का ? | | | | होय | नाही |
| ६. आपण सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिता का ? | होय | नाही | | जातप्रवर्ग: | |
| ७. आपण समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिता का ? | होय | नाही | महिला | खेळाडू | अपंग |
| ८. विवाहित महिलांच्या बाबतीत त्यांचे विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव: | | | | | |
| ९. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र आहे का ? | | | | होय | नाही |
| १०. आपणाकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे का ? | | | | होय | नाही |
| ११. महाराष्ट्र राज्यातून पदवि/ पदविका उत्तीर्ण केले आहे का ? | | | | होय | नाही |

| १२. | शाळेचे/ पदवी/पदविका संस्थेचे नाव | शालांत परीक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नाव | परीक्षेचे एकूण सर्व विषयांचे गुण/पैकी | टक्केवारी | पास झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम | | | | | |
| पदवी / पदविका **(AICTE/DTE APPROVED)** | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. पदवी / पदविकाच्या शेवटच्या सत्रात मिळालेले गुण | | टक्केवारी | |
| १४. अनुभव (असल्यास) - | | | |
| १५. अखंडीत (नियमित) सेवेचा दिनांक - | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६. | सध्याचे पद – | | | दिनांक: | | | पासून | |
| १७. | दि. | | रोजी अखंडीत सेवा | | वर्षे | | महिने | दिवस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? | होय | | नाही | |
| १९. झाली असल्यास, शिक्षेचा तपशिल नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. | | | | |
| २०. उमेदवाराविरुध्द खात्यांतर्गत चौकशी प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? | होय | | नाही | |
| २१. असल्यास, त्याबाबत तपशिल द्यावा | | | | |

प्रतिज्ञापत्र

मी, यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. उपरोक्त नमूद केलेली सर्व माहिती खरी असून, त्यापैकी कोणतीही माहिती खेटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

सोबत: खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | शालांत परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रक/प्रमाणपत्र | | २. | शाळा सोडल्याचा दाखला | |
| ३. | पदवी / पदविका उत्तीर्ण गुणपत्रक | | ४. | जातीचे प्रमाणपत्र / जातवैधता प्रमाणपत्र | |
| ५. | महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र | | ६. | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र | |
| ७. | दिव्यांग प्रमाणपत्र / खेळाडू प्रमाणपत्र | | ८. | आधार कार्ड | |
| ९. | एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण प्रमाणपत्र | | १०. | शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र | |

दिनांक – आपला विश्वासू,

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव – )

वरील अनु क्र. १ ते २१ मधील तपशिल कर्मचा-याच्या सेवाभिलेखावरुन पडताळून पाहता तो खरा असल्याचे आढळले.

(संबंधित सेवा अभिलेख परिरक्षित करीत असलेल्या
अधिका-याचे पदनाम व सही)
प्रशासकीय अधिकारी किंवा उच्च पदाधिका-याची सही

---

क्रमांक: दिनांक:

श्री./श्रीम. ------------------------------------------------ ,-------------------- पदनाम यांची --------------------------------------- या पदासाठी शिफारस करण्यात येत असून त्यांची निवड --------------------------------------- या पदाकरिता झाल्यास त्यांना त्वरीत कार्यमुक्त करण्यात येईल.

**खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त**

***<u>नगर अभियंता</u>***